महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे - ४११००५
Email id : mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/२५७३
दिनांक : १८/०७/२०२०

# आदेश

विषय :- पुणे महानगरपालिका हद्दीत कोव्हिड -१९ चा प्रादुर्भाव कमी करणेकामी प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत दि.१९/०७/२०२० रोजी जीवनावश्यक वस्तूंच्या दुकानाच्या वेळेत सवलत देणे बाबत.

संदर्भ :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
३) महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम,२०२०
४) महसुल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र. डीएमयु/२०२०/प्र.क्र./९२/डी आयएसएम-१, दिनांक २९ जुन २०२०
५) महापालिका आयुक्त कार्यालय जा. क्र. मआ/साप्रवि/२३६१ दि.१२/०७/२०२०
६) महापालिका आयुक्त कार्यालय जा. क्र. मआ/साप्रवि/२३९३ दि.१३/०७/२०२०

ज्याअर्थी राज्य शासनाने संदर्भ क्र. ४ च्या आदेशान्वये महापालिका आयुक्तांना साथ रोगाच्या फैलावास प्रतिबंध करण्यासाठी स्थानीय परिस्थिती विचारात घेऊन उपाय योजना करण्या बाबत निदेशित केले आहे,त्या अनुषंगाने संदर्भ क्र. ५ आणि ६ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. संदर्भ क्र. ४ अन्वये जीवनावश्यक वस्तू जसे सर्व किराणा दुकान, सर्व किरकोळ व ठोक विक्रेते, मटन, चिकन, अंडी, मासे इत्यादी ची विक्री व्यवसाय करणारे व्यापारी दुकाने दिनांक १४/०७/२०२० ते १८/०७/२०२० पर्यंत संपूर्णतः बंद होती,सतत पाच (५)

दिवस हि दुकाने बंद राहिल्या मुळे पुढील कालावधीत नागरिकांना जीवनावश्यक साहित्याचा पुरवठा होण्यासाठी आणि नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी म्हणून, मी विक्रम कुमार, आयुक्त पुणे महानगरपालिका मला प्राप्त अधिकारान्वये केवळ संदर्भ क्र. ५ मधील आदेशामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१) **केवळ दि.१९/०७/२०२० रोजी** जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणारी दुकाने जसे किरणा दुकान, मटन, चिकन, अंडी, मासे यांची विक्री सकाळी ०८:०० ते संध्याकाळी ०६:०० वाजेपर्यंत चालू राहील.

२) **दि. १९/०७/२०२० रोजी** सर्व संबंधित व्यवसायधारक यांनी नागरिकांना सुरक्षित अंतर ठेवून विक्री होण्यासाठी या पूर्वी दिलेल्या निदेशाप्रमाणे सर्व उपाय करावेत. यात हयगय झाल्यास त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

संदर्भ क्र. ६ मध्ये नमूद आदेशामधील इतर बाबींमध्ये कोणताही बदल नाही.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक १८/०७/२०२० रोजी दिलेला आहे.

ठिकाण :- पुणे
दिनांक :- १८/०७/२०२०

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका, पुणे

प्रत :- माहितीस्तव सादर
१. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे
३. मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर
४. मा. जिल्हाधिकारी, पुणे